सकाळ

# "गूगल डेस्कटॉप' आता नव्या स्वरूपात

कॅलिफोर्निया, ता. २३ - जगभरात अत्यंत लोकप्रिय असलेले "गूगल डेस्कटॉप सॉफ्टवेअर' आता अधिक आकर्षक स्वरूपात आणि अनेक नवीन सोयींसह उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सोयींमुळे संगणक प्रणालीच्या क्षेत्रातील आघाडीच्या "मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन'च्या "विंडोज'शी असलेली "गूगल'ची स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. ....
..... या संगणक प्रणालीतील काही सोयी भारतीय वंशाच्या तज्ज्ञांनी विकसित केल्या आहेत. "गूगल' प्रणाली मानस तुंगारे या मराठी तरुणाने, तर "वर्ड मेकर' हे शब्दकोडे श्रीधर गुरिवीरेड्डी आणि "क्रिकेट लाईव्ह स्कोअर्स'चा विकास श्रीनिवास मूर्ती यांनी केला आहे.

"गूगल'च्या अधिकाऱ्यांनी पत्रकारांना ही माहिती देताना, "गूगल'च्या सेवेचा लाभ घेणाऱ्यांनी नव्या सोयींचे विश्‍लेषण करावे आणि "सर्च इंजिन'ची सोय देणाऱ्या अन्य कोणत्याही संगणक प्रणालीशी तुलना करून पाहावी, असे आवाहन "गूगल'च्या संशोधन आणि तंत्रज्ञान विभागाच्या उपाध्यक्षा मारिसा मेयर यांनी केले.

त्या म्हणाल्या, ""नव्या "गूगल लॅब्ज'मध्ये "गूगल नोटबुक', "टेक्स्ट' आणि "ग्राफिक ऍप्लिकेशन' यांचा समावेश करण्यात आला आहे. याचा वापर करणाऱ्यांना आता टिपणे करणे किंवा संकेतस्थळांचा शोध आपोआप स्मृतीत साठवून ठेवता येणे शक्‍य होणार आहे.''

"गूगल'ने अमेरिकेच्या "नॅशनल एअरोनॉटिक्‍स अँड स्पेस ऍडमिनिस्ट्रेशन'च्या (नासा) सहकार्याने मंगळ ग्रहाचे तपशीलवार नकाशेही उपलब्ध करून दिले आहेत. काही दिवसांपूर्वी स्वतःचे "वेब पेज' तयार करण्याची आणि दुसऱ्या एका सोयीद्वारे दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम आणि व्हीडिओ शोधण्याचे काम सुकर केले आहे.